वन विभागाची पुनर्रचना- प्रसिध्दी व माहिती विभागाची स्थापना या योजनेत्तर योजनेमधील अंधारखोली सहाय्यक (Dark Room Assistant) या अस्थायी पदास मुदतवाढ सन २०१८-१९ मध्ये चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम -२०१८/प्र.क्र.३३/फ-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- ३१ मार्च, २०१८

वाचावे :-

१) शासन निर्णय क्रमांक, असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४.१०.२००४

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्रमांक-एफडीएम-२०१७/प्र.क्र.२६/फ-२, दि. १८.०१.२०१८.

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.०८/आपुक. दि.०५.०३.२०१८

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.:कक्ष- ३/योजनेत्तर/प्र.क्र.५२/१७-१८/२३३५, दि.१४.०३.२०१८

शासन निर्णय :-

वन विभागाची पुनर्रचना अंतर्गत प्रसिध्दी व माहिती विभागाची स्थापना या योजनेत्तर योजनेमधील अंधारखोली सहाय्यक या अस्थायी पदास संदर्भित क्र.३ वरील दि.१८.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ पर्यंत चालु ठेवण्यास शासनाची मंजुरी देण्यात आली होती. सदर मुदत दि.२८.०२.२०१८ रोजी संपृष्टात आली आहे. त्यामुळे खाली दर्शविलेल्या विवरणपत्रातील अस्थायी पद वन विभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या १ अस्थायी पदाला संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	अंधार खोली सहाय्यक (Dark Room Assistant)	१
	एकूण	**१**

२. या पदांवर होणारा खर्च -प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर) ०१ वनीकरण १०१ वनसंवर्धन विकास व पुनर्निर्मिती (०१) प्रशासन व संरक्षण (०१) (०१) प्रशासन व संरक्षण योजनेत्तर (२४०६ ००९६) ०१ वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा. सदर कालावधी मध्ये त्यांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेवून सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या नंतर सुधारीत आकृतीबंध निश्चीत करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/ आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११४५८४५९९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.31 15:00:26 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

<u>प्रतिलिपी</u> :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)/मुख्य वनसंरक्षक (सर्व)
३) प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) वित्त विभाग, व्यय १०/अर्थसं-४/ वित्तिय सुधारणा, मंत्रालय, मुंबई.
७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
९) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती, महसूल व वन विभाग, फ-२ कार्यासन.